
## साहित्य : **ललित ग्रंथ पुरस्कार । पडझड : अशोक पवार**



पालावर माझ्या आयुष्याची जवळजवळ २५ वर्षे गेली.
पालावर जगत असताना अनेक भटक्या-विमुक्त जाती-जमातींची पालं
माझ्या पालाशेजारी राहायची. वडारांची पालंसुद्धा आमच्या शेजारीच होती.
छाती फाडून घणाने दगड फोडणाऱ्या वडार समाजाच्या आताच्या 'पडझडी'ची कथा
मी 'पडझड' कादंबरीत रेखाटली आहे.

भटक्या-विमुक्त समाजातील तरुणांना पालाची दुनिया सोडून बाहेर पडणे
फारच अवघड आहे. व्यवस्थेने अशी एक अव्यवस्था करून ठेवली आहे की,
ती प्रत्येकाला आपल्या चाकोरीतले जीवन जगायला भाग पाडते.
मग पालावरच्या एखाद्याने पाल सोडून गावात, शहरात स्थायिक होण्याचा प्रयत्न केला;
तरीही गावगुंड, जातपंचायत, रीतीरिवाज यांच्या कैचीत पिचकू पिचकू मारते
आणि भटक्या-विमुक्तांचे जीवन नासवून
त्याला पोटाच्या खाईत संपवून टाकते.

# दगड फोडणाऱ्या समाजाच्या पडझडीची कहाणी

'पडझड' कादंबरीत वडार ह्या भटक्या-विमुक्त समाजाची व्यथा-वेदना मांडली असली,
तरी पडझड कोण्या एका माणसाची किंवा जातीची कथा मुळीच नाही; तर
'पडझड' ही मानवी दु:खाने बरबटलेल्या शोषित,
पीडित व भटक्या-विमुक्त समाजाची महागाथा आहे.
लोकांनी भटक्या-विमुक्त जाती-जमातींचे उपरेपणाचे जीवन समजून घ्यावे,
ही माफक अपेक्षा आहे.

वयाच्या पंचवीस वर्षापर्यंत पालावर राहिलो. पोटापायी बिराड घेऊन दर कोस, दर मुक्काम हिंडलो. मरणयातनेचे ते आयुष्य जगलो. लयी डाव मरणगावच्या रस्त्याने आत्महत्येच्या गावाला जाऊन आलो. वापस आल्यावर पुन्हा नव्याने बिराडातली भटकी-विमुक्त माणसं वाचली, अनुभवली आणि जगलीसुद्धा....

लहानपणात अचानक चुकून शाळेशी धागा जुळल्यामुळे जगाचा थोडाफार अभ्यास झाला. पुढे खूप संघर्ष करून बिराडातून बाहेर पडलो. जातपंचायतीचा बहिष्कृतपणाचा कायमचा शिक्का कपाळावर मारून घेऊन मजुरी करून जगू लागलो. अनेक पुस्तकं वाचली, मनात जगण्याची नवी उमेद जागी झाली...

तसा माझा बाप दारूड्या होता, आई खूप मेहनती होती. बाप शाळेच्या विरोधात. मी रोज मजुरी करून त्याच्या संसाराला हातभार लावावा, असं त्याचं मत होतं. तर आई पुतळाबाई मला शाळा शिकवून साहेब करण्याचं स्वप्न बघत होती. रात्रपाळीने चौथी आणि नंतर दहावी पास झालो. दहावीला चांगले मार्क्स होते. डी.एड.ला नंबर लागला होता. या वेळी थोडीशी मदत करणारा दाता भेटला नाही. असो. शाळा सोडली, लग्न केलं. वाट्याला बिराड आलं आणि साऱ्या आयुष्याची ससेहोलपट सुरू झाली. पुस्तकं हाती आली. वैचारिकता परिपक्व झाली आन् जगण्याला दिशा मिळाली.

'बिराड' हे आत्मकथन लिहिलं. बिराडच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघत आहेत. ते चार विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात आहे. भीक, भूक, दारिद्र्य आणि गुन्हेगारी यांच्या विळख्यात चिरडलेल्या ज्वलंत दु:खाची गाथा म्हणून समीक्षकांनी त्याची नोंद केली आहे. आत्मकथन लिहिलं की लेखक संपला. गाजलेल्या आत्मकथनाचे लेखक पुढे त्या दर्जाची पुस्तके लिहू शकले नाहीत. सर्व आत्मकथनात आल्यावर ठेंगा राहील का जवळ? जा, बिराडनंतर तुम्ही आराम करा- असा सल्लाही मला मान्यवरांनी दिला. मी तो शांतपणे ऐकून पुढे चालत राहिलो. बिराड २००१ मध्ये आलं. नंतर पुन्हा मी भाकरीच्या शोधात पायाला भिंगरी बांधून भटकू लागलो. जवळजवळ सातएक वर्षे थांबलो. २००८ मध्ये 'इळन्‌माळ' कादंबरी लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केली. २०१० मध्ये 'दर कोस दर मुक्काम' नावाची कादंबरी मनोविकास प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केली. आता त्यांनीच २०१३ मध्ये 'तसव्या' नावाची कादंबरी

प्रकाशित केली, तर २०११ मध्ये लोकवाङ्मय गृहाने 'पडझड' नावाची कादंबरी प्रकाशित केली होती. माझ्या साऱ्याच पुस्तकांच्या आवृत्त्या निघाल्या. सारीच पुस्तकं मान्यवर समीक्षकांकडून, वाचकांकडून चर्चिली गेली. पुरस्कृत झाली. विद्यापीठीय अभ्यासक्रमात गेली. मी जेवढा यापूर्वी अस्वस्थ नव्हतो, तेवढा अस्वस्थ आता होत चाललो. माझ्याजवळ आयुष्य थोडे आहे आणि मला खूप काही लिहायचे आहे. मी सदा वावरत राहतो अनुभवांच्या विद्यापीठात. तेच उतरवतो, वेळ मिळेल तेव्हा कागदावर.

'पडझड' कादंबरी लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केली. स्वातंत्र्यानंतरच्या भटक्या-विमुक्तांच्या चौथ्या पिढीतील मुलं-मुली शिक्षण घेत आहेत. या चौथ्या पिढीसोबतच प्रचंड स्पर्धेचे महायुग जन्माला आलेले आहे. येथे कोणीच कोणाचा वाली नाही. दलित चळवळीची फाटाफूट झाली. कामगार चळवळी थंड पडल्या. भ्रष्टाचाराने कहर केला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने मानवी जीवनाचे जगण्याचे संदर्भच बदलून टाकले. चोरी करणारे चोरच, आपल्या घरी चोरी झाली म्हणून बोंब ठोकायले. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या भटक्या-विमुक्तांचा टिकाव कसा लागेल? ते थोडेफार शिकले, पण हाताला काम लागले नाही; परिणामी बेरोजगारीच नशिबी आली. पण पोट तर असतंच ना! पोट भरण्यासाठी त्यांनी विविध मार्ग अवलंबिले. या सर्व परिस्थितीची मांडणी मी 'पडझड' कादंबरीत केलेली आहे.

लहानपणापासून चोरी करणं, दारू पिणं, भीक मागणं, भांडणं करणं- असं पालावरचं जीवन माझ्या पदरात आलं. अवहेलना, अपमान पाचवीला पुजलेला. यातूनच वाचनाचं वेड लागलं. शाहू, फुले, आंबेडकर, मार्क्स, गांधी, मॅक्झिम गॉर्की, लिओ टॉलस्टॉय, अँतोन चेकाव्ह अभ्यासले. जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजव्यवस्थेने भटक्या-विमुक्तांच्या पाठीवर अथांग वेदनांचे ओझे लादले. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवी मूलभूत गरजांपासून कोसो दूर ठेवले. 'पडझड' कादंबरीत वडार ह्या भटक्या-विमुक्त समाजाची व्यथा-वेदना मांडली असली, तरी पडझड कोण्या एका माणसाची किंवा जातीची कथा मुळीच नाही; तर 'पडझड' ही मानवी दु:खाने बरबटलेल्या शोषित, पीडित व भटक्या-विमुक्त समाजाची महागाथा आहे. लोकांनी भटक्या-विमुक्त जाती-जमातींचे उपरेपणाचे जीवन समजून घ्यावे, ही माफक अपेक्षा आहे. 'पडझड' कादंबरी अक्षरवाङ्मय असल्याचा दावा मी करीत नाही आणि करणारही नाही. तसा न्यूनगंड माझ्यात निर्माण होऊ नये, म्हणून मी स्वत:ला जपतो.

'पडझड' या कादंबरीचा प्रवास सुरू होतो पालावरून आणि भटक्यांच्या पालावरच संपतो. या कादंबरीत भटक्या-विमुक्त जाती-जमातींतील वडार या जमातीत 'तुका' नावाचा तरुण जन्माला येतो. पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या व दगड फोडणाऱ्या या जातीतील अनेक जीवघेणे अनुभव मी जसेच्या तसे मांडले आहेत. या कादंबरीचा नायक तुका आहे आणि नायिका शोभा आहे. ही कादंबरी म्हणजे काही एकाच सुशिक्षित बेरोजगाराची कहाणी नाही, तर हजारो सुशिक्षित होऊन वाट्याला बेरोजगारी आलेल्या बांधवांच्या कपाळावरची ती भळभळती जखम आहे. याच कादंबरीचा सहनायक 'नामा' परिस्थितीवर मात करून एम.ए.पर्यंतचे शिक्षण घेतो. नोकरीसाठी खूप प्रयत्न करतो, पण खिसा फाटका असल्यामुळे नोकरी मिळत नाही. तो बायकोला घेऊन मुंबईला जातो, तेथे भीक मागून आपला उदरनिर्वाह करत असतो. तो कधी कधी पालावर यायचा. पालावर आल्यावर मी मुंबईला नोकरीला लागलो म्हणायचा. तुकाही बेरोजगारीच्या खाईत पुरता होरपळल्यावर मुंबई गाठतो- नामाच्या सहकार्याने नामावानी कंपनीत नोकरी लागण्यासाठी. आणि त्याला नामाच्या जगण्याचे कोडे उलगडते. तो आतून-बाहेरून फाटून जातो.

पालावर माझ्या आयुष्याची जवळजवळ २५ वर्षे गेली. पालावर जगत असताना अनेक भटक्या-विमुक्त जाती-जमातींची पालं माझ्या पालाशेजारी राहायची. वडारांची पालंसुद्धा आमच्या शेजारीच होती. छाती फाडून घणाने दगड फोडणाऱ्या वडार समाजाच्या आताच्या 'पडझडी'ची कथा मी 'पडझड' कादंबरीत रेखाटली आहे.

भटक्या-विमुक्त समाजातील तरुणांना पालाची दुनिया सोडून बाहेर पडणे फारच अवघड आहे. व्यवस्थेने अशी एक अव्यवस्था करून ठेवली आहे की, ती प्रत्येकाला आपल्या चाकोरीतले जीवन जगायला भाग पाडते. मग पालावरच्या एखाद्याने पाल सोडून गावात, शहरात स्थायिक होण्याचा प्रयत्न केला; तरीही गावगुंड,

जातपंचायत, रीतीरिवाज यांच्या कैचीत पिचकू पिचकू मारते आणि भटक्या-विमुक्तांचे जीवन नासवून त्याला पोटाच्या खाईत संपवून टाकते. तुका व्यवस्थेशी संघर्ष करतो; पण त्याला याचीही जाणीव आहे की, ही प्रचंड महाकाय व्यवस्था एकाएकी तुटणार नाही, वाकणार नाही... पण तो आशावादी आहे. या व्यवस्थेला किमान आपण एक दगड मारू शकतो, असे त्याला वाटते. आज शिक्षणासाठी आपल्या मुलाबाळांना मायबाप किती खर्च करून शिकवितात, पण तुकाजवळ त्याच्या बापजाद्यापासून काहीच नाही. तो साऱ्या जन्माचा नंगाड आहे, तरी त्याची शिक्षण घेण्याची जिद्द वाखाणण्याजोगी आहे. परिस्थितीमुळे शिक्षण सोडू पाहणाऱ्या मुलांना तुका नवी प्रेरणा देऊन शिकायला प्रवृत्त करेल. तशी मला माझी सर्वच पुस्तकं अतिप्रिय व महत्त्वाची आहेत. मी माझ्या प्रत्येक पुस्तकात एक नवा संदेश दिलेला आहे. तसाच नवा संदेश मी 'पडझड' कादंबरीत दिलेला आहे.

तशी माझी सर्वच पुस्तकं वाचली, नामवंतांनी त्यांचे तोंड भरून कौतुक केले. आत्मकथन लिहिल्यावर लेखक संपतो, नंतर तो चांगली पुस्तकं लिहू शकत नाही– हा समज मला वाटते, मी खोटा ठरवला. तुम्ही म्हणाल, स्वत:ची खूपच स्तुती करीत आहे. मला ते आवडत नाही. माझा स्वभावही तसा नाही. पण जे वास्तव आहे, ते मी या ठिकाणी सांगत आहे– तुमच्यासमोर मांडत आहे. असो. एवढं शिकून मी भीक का मागतो? या व्यवस्थेने चिरडून टाकल्यामुळे... स्वातंत्र्य हिरावून घेतल्यामुळे... आत्मविश्वास गमावल्यामुळे– मी भीक मागतो, असं नामा सांगतो. पोलिसांचा मार, महिलांची सोशिकता, गावकऱ्यांचे भटक्या-विमुक्तांना न समजून घेण्याचे संदर्भ... असे बरंच काही मी 'पडझड' कादंबरीत शब्दबद्ध केलं आहे.

**अशोक पवार,** चंद्रपूर
Mob.: 9823563765

ओळख
**अशोक पवार**

# वेदनांना पोटतिडकीने उजागर करणारी कादंबरी

## अनंता सूर

अशोक पवार यांना महाराष्ट्रातील अनेक पुरस्कार आजवर मिळाले, परंतु महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळणे म्हणजे अशोक पवार साता समुद्रापलीकडे गेल्याची साक्ष दर्शविणारे आहे. बारा गावचं पाणी पिऊन जगलेल्या माणसाचा हा खऱ्या अर्थाने सत्कार होय.

ज्या आसरूबा (अशोक) नावाच्या मुलाने मराठवाड्याच्या मातीचा गुणधर्म उरी बाळगून भटक्यांच्या जीवनाला खऱ्या अर्थाने वाचा फोडणारे साहित्य जन्माला घातले, तेच साहित्य आज आत्मकथन (बिराड) आणि कादंबऱ्यांच्या (इळनमाळ, दर कोस, दर मुक्काम, पडझड, तसव्या) रूपाने मराठी वाचकांच्या कानापर्यंत पोहोचले याला मुख्य कारण त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये बेलदार, पारधी, वडारांसारख्या सतरा पगड जातींतील जीवनसंघर्षाचा वास्तवपणे वेध घेण्याची जाणीव आहे. स्वातंत्र्याच्या पासष्टीनंतरही जो भटका समाज अन्न, वस्त्र, निवाऱ्यांसारख्या मौलिक गरजांपासून वंचित राहिला; त्यांचे भटकंतीमय जगणे पवारांच्या साहित्याचे केंद्रस्थान आहे. माणसाला जाती-धर्माच्या नावावर बंदिस्त न करता माणूस म्हणून सन्मानाने जगता आले पाहिजे, सामाजिक न्यायाच्या प्रवाहात तोसुद्धा सामील झाल्यास आयुष्य कल्याणकारी होईल- हा आत्मविश्वास उरी बाळगून पवारांचे साहित्य जन्म घेताना दिसते.

अशोक पवारांच्या आयुष्याला वाङ्मयीन दृष्ट्या कलाटणी देणारी पहिली साहित्यकृती म्हणून २००१ मध्ये प्रकाशित झालेल्या 'बिराड' आत्मकथनाचा विचार करावा लागतो. वास्तविक पाहता, ज्या २४ व्या अस्मितादर्श साहित्य संमेलनात डॉ.आ.ह.साळुंकेंच्या हस्ते 'बिराड'चं इचलकरंजीला प्रकाशन होणार होते, त्या कार्यक्रमाला जाण्यासाठीही पवारांकडे पैसे नव्हते. अशा स्थितीत बायकोच्या अंगावरचे मंगळसूत्र विकून ते कार्यक्रमाला हजर झाले. पोटाची खळगी भरण्यासाठी मजुरीशी संघर्ष चाललेला असताना आकाराला आलेले हे आत्मकथन अंगावर काटे आणणारे आहे. शिक्षणासाठी करावा लागलेला संघर्ष, पावसाळ्यातील उपासमारीचे दिवस, उपाशीपोटी पोटाची भूक शमविण्यासाठी पावसाळ्यात सडलेली बकरी खाण्याचा प्रसंग, आडगावच्या वसतिगृहातील पुस्तके आणि कपड्यांसाठी केलेला संघर्ष, साहेबांकडे खरे सांगितले म्हणून संचालकाचे वसतिगृहाच्या बाहेर काढणे, दहावीत पहिले लग्न, यशोदापासून विजय नावाचा मुलगा, यशोदाने सोडून मायबापाकडे जाणे, टीबी झाल्यामुळे मौलवीचे विजयला अनाथाश्रमात टाकण्यापासूनचे अनेक मरणोसन्न प्रसंग पवारांनी जीवनात प्रत्यक्षपणे अनुभवले. पालावर राहणाऱ्या भटक्यांच्या आयुष्यातील इतके बेदर्दी जगणे यापूर्वी इतक्या सशक्तपणे कुणीही मांडले नव्हते. त्यामुळे नेमक्या शब्दांतून मोठा आशय दर्शविणारे पवारांचे हे आत्मकथन वाचकाला पानोपानी अस्वस्थ आणि सुन्न करते.

'बिराड'च्या निर्मितीनंतर जवळपास सात-आठ वर्षे संसाराचा गाडा ओढण्यासाठी पवारांचा संघर्ष चालू होता. पालावरून आल्यानंतर चंद्रपूरच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेत बचतगटाचे काम करून अवघ्या तीन-साडेतीन हजारांच्या मानधनावर चरितार्थ चालवणारा अशोक पवार नावाचा माणूस, कलावंत आणि मित्र मी मागील सात-आठ वर्षांपासून अनुभवतो आहे. माझी त्याच्याशी पहिली भेट झाली ती साधारणपणे 'इळनमाळ' या कादंबरीच्या लेखन- काळातच. अनुभवाचं कधीही न संपणारं गाठोडं या माणसाजवळ असल्यामुळे आजही चार-पाच नव्या कादंबऱ्या सहजपणे लिहू शकेल, यात गैर नाही. मात्र 'इळनमाळ'मधून पवारांनी मारोती आणि राधा या साक्षरांच्या जगण्याचे जे भेदक वास्तव मांडले आहे, ते वाचताना वाचकाच्या अंगाचा थरकाप उडतो. आत्मचरित्रात्मक कादंबरी म्हणून या कादंबरीकडे समीक्षकांनी पाहिल्याचे स्पष्टरीत्या जाणवते. मारुतीचे पहिले लग्न मीराबरोबर होते, परंतु तो मीराकडे वेळत जात नसल्यामुळे ती दुसऱ्याबरोबर लग्न करते. मीराला

त्याच्यापासून दोन मुले झाल्यानंतर तो टीबी होऊन मरतो आणि पुन्हा तिच्या आयुष्याची वाताहत होते. मारुती मात्र मीरानंतर लग्न झालेल्या राधाच्या प्रेमात पडतो. तिच्यासाठी प्रसंगी मारही खाऊन पोट भरण्यासाठी रेडिओ, घड्याळे विकण्यापर्यंतचे फसवाफसवीचे उद्योगही करतो. बेलदारांच्या जगण्यातील एक सखोल विदारकता 'इळनमाळ'मध्ये पानोपानी वाचायला मिळते. म्हणून 'बिराड' आणि 'इळनमाळ'च्या लेखनासाठी अखिल भारतीय पातळीवरील संस्कृती प्रतिष्ठान, नवी दिल्लीचा पुरस्कारही त्यांना मिळाला.

पारधी समाजातील भटक्यांचे जगणे असो वा बेलदारांचे; साऱ्याच जगण्याच्या पातळ्यांवर जीवनातील संघर्षमय अनुभव पवारांनी सामर्थ्याने उभा केलेला दिसतो. पोलीस, पाटील आणि गावातील सरपंच यांच्या भीतीने दारूचा धंदा सोडून मध्य प्रदेशात चोरी करण्यासाठी निघालेले पारधी 'दर कोस, दर मुक्काम'मध्ये पवार जिवंतपणे मांडतात. पोट भरण्यासाठी पैसा लागतो म्हणून हेच पारधी कधी दादा लोकांकडून पैसा घेतात, तर कधी दरोडा टाकण्यासाठी रात्रभर योजना आखून आलेला दिवस मौजमस्तीत घालवण्याची स्वप्नं रंगवतात; परंतु जेव्हा गावातील स्त्रीचा खून करण्याची वेळ अंगलट येते, तेव्हा हे पाप आपल्या हातून घडू नये म्हणून खबरदारी घेत गाव

पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या वडार जमातीतील तुक्याचे जीवनानुभव रेखाटणारी 'पडझड' ही कादंबरी खरे तर आजच्या बेरोजगार युवकाचे प्रतिनिधित्व करते. जो ध्येयवाद, आशा-आकांक्षा घेऊन जीवनाशी आणि परिस्थितीशी दोन हात करीत तरुण शिकतो; त्याच्यावरही शेवटी बेरोजगार म्हणून शिक्का मारला जातो. इथेच नव्या पिढीतील युवकांचा खऱ्या अर्थाने अपेक्षाभंग होत असेल, तर नव्या युगातील भारताच्या प्रगतीचे शिलेदार कुणाला म्हणायचे?

सोडून मानवीपणाची जाणीवसुद्धा देतात. सुख-दुःखाचे वाटेकरी होऊन हे भटके भुकेवर मात करतात. प्रत्येक पात्राच्या अंगी जिव्हारी लागणारी शब्दकळा वापरण्याचे कसब पवारांना भटकंतीच्या जगण्यातून प्राप्त झालेले आहे. गुलब्यासारख्या नायकाच्या वेदनामय संघर्षातून विदर्भातील अमरावती, वर्धा, यवतमाळच्या परिसरात घडलेली कथानकता पवारांनी चिंतनशीलपणे रेखाटलेली आहे.

ज्या 'पडझड'साठी अशोक पवारांना महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार जाहीर झाला, ती वडार समाजातील तुक्या नावाच्या नायकावर लक्ष केंद्रित करणारी कादंबरी आहे. एखाद्या बांडगुळासारखे पालावर जीवन जगूनही इथला भ्रष्टाचार आणि राजकारणी प्रवृत्तीने भटक्यांच्या जगण्याचे आरक्षणाच्या नावाखाली कसे वाटोळे करून ठेवले आहे याचा प्रत्यय त्यात येतो. नाम्यासारखे उच्च शिक्षण घेऊन मोठ्या शहराच्या ठिकाणी गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळवावी, या ध्येयाने तुक्या वसतिगृहात मुलांना शिकवून स्वतःही शिकतो. बी.ए. झाल्यानंतर नोकरीसाठी धडपडतो आणि शेवटी शहरातील रस्ते पहिल्यांदा शेणामातीने घाण करून येताना सफाई करण्याचे काम मनाविरोधात जाऊन करण्याची वेळ येते. या देशात भटक्यांच्या मुलांची स्थिती अत्यंत दारूण आहे. कितीही शिकला तरी भ्रष्टाचार, हुंडा, मतलबीपणा आणि राजकारणाच्या प्रवाहात तो स्वतःच्या जीवनाला स्थिर करण्यासाठी नोकरी मिळवू शकत नाही याची एक खोल सल तुक्याच्या मनात उतरते. अशा वेळी देशाच्या स्वातंत्र्याचा फायदा आपल्याला काय मिळाला, याचे उत्तर 'काहीच नाही'- आपण कालही बेवारशासारखे होतो आणि आजही आहोत, हेच वेळोवेळी मिळत जाते.

पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या वडार जमातीतील तुक्याचे जीवनानुभव रेखाटणारी 'पडझड' ही कादंबरी खरे तर आजच्या बेरोजगार युवकाचे प्रतिनिधित्व करते. जो ध्येयवाद, आशा-आकांक्षा घेऊन जीवनाशी आणि परिस्थितीशी दोन हात करीत तरुण शिकतो; त्याच्यावरही शेवटी बेरोजगार म्हणून शिक्का मारला जातो. इथेच नव्या पिढीतील युवकांचा खऱ्या अर्थाने अपेक्षाभंग होत असेल, तर नव्या युगातील भारताच्या प्रगतीचे शिलेदार कुणाला म्हणायचे? मराठवाड्यातील परभणीचा परिसर घेऊन येणारी तुक्याची जीवनगाथा मांडणारी ही कादंबरी

लोकशाही व्यवस्थेने नव्या पिढीच्या वाट्याला घातलेल्या अंधाऱ्या आयुष्याची जाणीव करून देते. इतकेच नव्हे तर, एम.ए.पर्यंतचे उच्च शिक्षण नाम्याने घेऊनसुद्धा पैसे भरण्याची सोय नसल्यामुळे मुंबईला जाऊन भीक मागण्याचा मार्ग स्वीकारवा लागतो. आजपर्यंत तुक्या ज्या नाम्याकडे आदर्श म्हणून पाहत होता, त्याच्याच जीवनाची वाताहत पाहून तो पूर्णपणे कोलमडून पडतो. आजही समाजात असे सुशिक्षित नाम्या गल्लोगल्ली आहेत. त्यांच्याही वाट्याला भीक मागून जगणेच आले आहे.

ज्या ऐतिहासिक काळात वडारांनी टोलेजंग इमारती, किल्ले, बुरुज, तटबंद्या आणि राजवाडे बांधले; त्यांची चौथी पिढी कशी नेस्तनाबूत झाली याचे मार्मिक चित्रण 'पडझड'मध्ये ताकदीने मांडले आहे. आजही ही बिनचेहऱ्याची माणसं आमच्यासारख्या सुजाण वाचकांना गावोगावी, शहरोशहरी जीवाचा आटापिटा करून, मिठात पीठ घालून जगताना दिसतात; परंतु त्यांच्या आयुष्यातील धग जाणून घेण्यासाठी आमच्याकडे वेळ नाही. माणसाचे आयुष्य समजून घेण्यासाठी वेळ नसलेले आम्ही 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' अशी कोणती प्रतिज्ञा आपल्या तोंडी अभिमानाने घेतो, हे कळत नाही. भविष्यात या वडारांचे कोणते आणि किती प्रश्न सुटतील, याचे उत्तर येणारा काळच देईल. मात्र त्यांच्या वेदनांना इतक्या पोटतिडिकीने उजागर केल्याबद्दल आणि त्यांच्या जीवनसंघर्षातून आलेली 'पडझड' जन्माला घातल्याबद्दल अशोक पवार नावाचा माझा मित्र, माणूस आणि कलावंत निश्चितच गौरवास पात्र आहे. अलीकडेच स्त्री-संघर्षाला वाचा फोडणारी त्यांची 'तसव्या' नावाची कादंबरी मनोविकास प्रकाशनाने प्रकाशित केली. केवळ भटक्यांच्याच नव्हे, तर निखळ स्त्री-लढ्याच्या प्रश्नालासुद्धा आपण वाचा फोडू शकतो, हे गिरिजा या नायिकेच्या माध्यमातून पवारांनी सिद्ध करून दाखविले.

**डॉ. अनंता सूर,** यवतमाळ
Mob.: 9421775488